# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र






०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र.जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/०२ /पोलीस अधिक्ष,क कार्यालय भंडारा, दिनांक:- ०१/०१/२०१९

## “अल्पवयीन मुलीचा विनयंभग करून गंभिर दुखापत करणाऱ्या ईसमास चार वर्षे सश्रम कारावास व १३००० रूपये द्रंव्यदंडाची शिक्षा ठोठावली''

**पोलीस ठाणे भंडारा** :– आरोपी नामे हर्षदीप अनिल माटे, वय २८ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड नाग मंदीर जवळ भंडारा याने रमन जगन्नाथ मेश्राम वय ४५ वर्ष, रा. इंदिरा गांधी वार्ड भंडारा यास चाकुने मारुन दुखापत केल्याचा आरोप सिध्द् झाल्याने आज दिनांक ३१/१२/२०१८ रोजी **मा. प्रमुख व जिल्हा सत्र न्यायाधिश भंडारा श्री. संजय देशमुख सा.** भंडारा सा. यांनी आरोपीस ४ वर्ष सश्रम कारावास व १३०००/–रू. दंड व दंड न भरल्यास वाढीव कारावासाची शिक्षा ठोठावली.

याबाबत अधिक माहिती अशी आहे की, दिनांक ०९/०२/१७ ला तक्रारदार रमन जगन्नाथ मेश्राम वय ४५ वर्ष, रा. इंदिरा गांधी वार्ड भंडारा याने पोस्टेला येवुन तोंडी तक्रार दिली की, दिनांक १२/०२/२०१७ रोजी रात्री ११.१५ वा. दर. तक्रारदार हा घरी झोपला असतांनी घराचे समोरील दाराला ठोकण्याचा आवाज आला तेव्हा दार उघडून पाहीले असता दारासमोर हर्षदीप अनिल माटे हा उभा होता. रात्र असुन घरी जाण्यास सांगीतले. असता त्याने शिवीगाळ केली. पत्नी आडवी आली असता पत्नीला मारपीट केली. नंतर त्याने खिश्यातुन चाकु काढून मारण्यास सुरुवात केली. तुझ्या मुलीने शाळेतील मुलांना का सांगीतले असे म्हणुन तक्रारदाराच्या छातीवर, खांदयावर, मारुन जखमी केले. तसेच पत्नी व मुलीला मारल्याचे सांगीतल्या वरुन अपराध क्रमाक ९२/२०१७ कलम ३२६,३२३,५०४,५०६, भा.द.वी आर डब्लु ४/२५ भा. ह. का. अन्वये गुन्हा नोंदवुन गुन्हयाची गांभिरता लक्षात घेवुन गुन्हयाचा तपास सहायक फौजदार ओमप्रकाश केवट यांनी सुरू केला.

सदर गुन्हयाचा तपास सहायक फौजदार ओमप्रकाश केवट यांनी करून आरोपी हर्षदीप अनिल माटे, वय २८ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड नाग मंदीर जवळ भंडारा यास अटक केली. तपासात आरोपी विरूध्द् योग्य व सबळ पुरावे प्राप्त झाल्याने आरोपी विरूध्द् गुन्हयात कलम ३२३,५०४,५०६,३५४(ड), भा. द.वी मध्ये १२ पोक्सो ॲक्ट वाढ करण्यात आलेली आहे. महिला पोलीस हवालदार प्रभा कुळमते यांनी आरोपपत्र तयार करून सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले

सदर आरोप पत्रास स्पेशल केस.क्र. १७/१७ सदर गुन्हयाची सुनावणी **मा. प्रमुख व जिल्हा सत्र न्यायाधिश भंडारा श्री. संजय देशमुख सा.** यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री. रमाकांत खत्री, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले, आज दिनांक ३१.१२.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन आरोपी नामे हर्षदीप अनिल माटे, वय २८ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड नाग मंदीर जवळ भंडारा यांचे विरूध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३५४ भादवि अन्वये ४ वर्ष, सश्रम कारावास ५०००/–रु दंड, कलम ३२३ भादवि मध्ये १ वर्ष कारावास व १००० रूपये दंड, कलम ५०४ भादवि मध्ये ६ महिणे कारावास व ५०० रूपये दंड, कलम ५०६ भादवि मध्ये ६ महिणे कारावास व ५०० रूपये दंड, कलम ८ पोस्को कायदा मध्ये ४ वर्ष कारावास व ३००० रूपये दंड तसेच कलम ४/२५ आर्म ॲक्ट मध्ये ३ वर्ष कारावास व ३००० रूपये दंड सदर दंडाची रक्कम न भरल्यास वढीव कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.**

सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक सुधाकर चव्हाण, ठाणेदार पोलीस ठाणे भंडारा यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार हर्षवर्धन मेश्राम यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन उत्तम कामकाज केले.

( जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उप निरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.